



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २३७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.०८ एप्रिल २०२५





# राम नवमीनिमित्त ६५० दिंड्या दाखल, शेगाव नगरी भक्ती रसात चिंब

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, बुलडाणा :** संत गजानन महाराज संस्थानच्या मुख्य उत्सवापैकी एक असलेल्या श्रीराम नवमी निमित्त रविवारी विदर्भ पंढरी शेगावात लाखावार भाविकांची म ांदियाळी जमली आहे. विदर्भासह राज्यभरातील कमी अधिक पायदळ दिंड्या देखील शनिवारी रात्री पर्यंत डेरे दाखल झाल्या आहे. गजानन महाराज समाधी स्थळी नतमस्तक होण्यासाठी हजारो आबालवृद्ध भाविकांच्या रांगा लागल्या. जय श्रीराम आणि गण गण गणात बोते च्या जयघोषाने आसमन्त दुमुमला असून संपूर्ण मार्ग भाविकानी फुलून गेले आहेत. यामुळे रणरणत्या उन्हातही संत नगरी भक्ती रसात चिंब झाल्याचे चित्र या पवित्र नगरीत निर्माण झाले आहे. संत नगरी शेगाव येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १३१ वा श्रीराम नवमी उत्सव सोहळा रविवार ६ एप्रिल रोजी भक्तिमय व मंगलमय वातावरणात साजरा होत आहे. या सोहळ्यासाठी संत नगरी नटल्याचे दिसून आले. श्री संत गजानन महाराज संस्थान मध्ये होणाऱ्या श्रीराम जन्मोत्सवानिमित्त श्रींच्या मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून मंदिर परिसर केळीचे खांब, आंब्याची तोरणे, भगव्या पताका आणि ध्वजानी शुशोभीत करण्यात आला आहे.श्रीराम जन्मोत्सवाच्या पूर्वसंध्येला राज्यभरातून श्रीराम नवमी उत्सवासाठी ६५० च्या आसपास भजनी दिंड्या संतनगरीत



दाखल झाल्या होत्या. भजनी दिंड्या येण्याचा ओघ संतनगरीत आज रविवारी, ६ एप्रिलला देखील सुरूच होता. हरे रामा हरे रामा रामा हरे हरे, हरे कृष्णा हरे कृष्णा कृष्णा हरे हरे श्रीराम जय राम जय जय राम, जय गजानन श्री गजानन, गण गण गणात बोते मंत्राचा नाम घोष करीत भजनी दिंड्या टाळ मृदंगाच्या निनादात संतनगरीत दाखल झाल्या.

**यज्ञाची सांगता...**

यापूर्वी श्रींच्या मंदिरात १३१ वा श्रीराम नवमी उत्सवाला गुढीपाडवा ३० मार्च रविवार पासून प्रारंभ झाला. त्या अनुषंगाने श्रींच्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये दररोज मंदिरामध्ये काकडा भजन दुपारी प्रवचन सायंकाळी हरिपाठ व रात्री महाराष्ट्रातील नामवंत महाराजांचे कीर्तन आदि विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. श्रीराम नवमी उत्सवादरम्यान आध्यात्म रामायण स्वाहाकारास यज्ञाला २ एप्रिल बुधवार ला आरंभ होऊन आज रविवार ६ एप्रिल श्रीराम नवमी दिनी सकाळी १० वाजता यज्ञाची पूर्णाहुती व अवभृतस्नान झाले. त्यानंतर सकाळी १० ते १२ यादरम्यान ह.भ.प श्रीराम बुवा ठाकूर यांचे श्रीराम जन्मोत्सवाचे कीर्तन झाले. दुपारी १२ वाजता श्रीराम जन्मोत्सव सोहळा गुलाल पुष्पांची उधळण करत सनई चौघडांच्या मंगलमय वातावरणात व टाळ मृदंगाच्या निनादात भाविक भक्तांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

**नगर परिक्रमा...**

श्रींच्या मंदिर परिसरातून दुपारी श्रीराम नवमी उत्सवा निमित्त श्रींची पालखी रथ, अश्वासह, पताकाधारी टाळकरी व वारकरी टाळ मृदुंगाच्या निनादात व हरिनामाच्या गजरात पालखी परिक्रमाकरिता निघणार आहे. सायंकाळी श्रींची पालखी श्रींच्या मंदिरात नगर परिक्रमा करून पोहोचेल व आरती होईल. श्री पालखी परिक्रमा मंदिर परिसरातील सेवाधारी प्रसादालय जवळील उत्तर द्वारातून, महात्मा फ ुले बँके समोरुन, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीराव फुले चौकातून, श्री संत सावता माळी चौक, श्री हरिहर मंदिर जवळून, भिम नगर (तिन पुतळा परिसर), शाळा नं. २ (सावित्रीबाई फुले चौक), फुले नगरातून, श्री प्रगटस्थळ जवळून, सितामाता मंदिर, लायब्ररी जवळून (श्री गर्गाचार्य मंदिरा समोरुन), पश्चिम गेटमधून श्री मंदिर परिसरामध्ये सायं. ६.०० वाजताचे आसपास परत येईल.

**दर्शनासाठी एकेरीमार्ग...**

श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गर्दी लक्षात घेता मंदिर परिसरात एकेरी मार्ग करण्यात आला आहे. त्यात दर्शनबारी, श्रीमुख दर्शनबारी, महाप्रसाद, श्रींचे पारायण मंडप, श्रींची गादी पलंग, दर्शनाची व्यवस्था करण्यात आली आहे. आज पहाटे दर्शनसाठी दीड तास लागत होते. दुपार पर्यंत याला तीन तास लागत होते. शनिवारी रात्रभर मंदिर दर्शनसाठी उघडे असतानाही दर्शनाला अडीच ते तीन तास लागत आहे. आज रविवारी देखील रात्री मंदिर सुरूच राहणार आहे.

**उत्सवांची सांगता**

श्रीराम नवमी उत्सवाची सांगता ७ एप्रिल सोमवार ला होणार आहे. ह.भ.प.प्रमोद बुवा राहणे यांचे सकाळी ६ ते ७ काल्याचे किर्तन व गोपालकाला होऊन उत्सवाची सांगता होईल.

## थोडक्यात

### पोलिस हवालदाराची गळफास घेऊन केली आत्महत्या

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.०७, सावंतवाडी :** कुडाळ पोलीस ठाण्यात हवालदार पदावर कार्यरत असलेल्या सुरज अनंत पवार (वय ३१ वर्षे, रा. मळगाव-कुंभार्लीवाडी, ता. सावंतवाडी, सध्या रा. कुडाळ) याचा मृतदेह ते राहत असलेल्या फ्लॅट मध्ये सिलिंग फॅनला गळफास घेतलेल्या अस्वस्थेत आढळून आला. तपासाअंती सूरज यांनी आत्म हत्या केली असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार सुरज अनंत पवार हे कुडाळ पोलीस ठाण्यात हवालदार पदावर कार्यरत होते. अलीकडेच काही महिन्यांपूर्वी आवळेगाव दूरक्षेत्र येथून ते कुडाळ पोलीस ठाण्यात हजर झाले होते. ते कुडाळ मधील कॉम्प्लेक्स मध्ये एकटेच राहत होते. आज दुपारी त्याच्या मित्राच्या मोबाईल वर त्यांनी 'तुला कुडाळला यावेच लागेल, मी जीवन संपवीत आहे' अशा आशयाचा मेसेज टाकला. त्या मित्राने याची कल्पना त्याचा मळगाव येथील भावाला दिली. ते तातडीने कुडाळला आले. तो राहत असलेल्या फ्लॅटवर गेले असता बाहेरुन कुलूप लावलेले होते. परंतु किल्ली बाहेर ठेवलेली होती. त्यांनी दरवाजा उघडून आत प्रवेश केला असता सुरज पवार पंख्याला दोरीने गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आले. त्यांना रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरनी त्यांना मृत घोषित केले. सुरज यांच्या आत्महत्येचे नेमके कारण मात्र समजू शकले नाही.

### रेल्वे प्रवाशांसाठी आनंदाची बातमी...




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, अकोला :** उन्हाळ्यातील प्रवाशांची मोठ्या प्रमाणातील गर्दी लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने पुणे ते नागपूर दरम्यान अतिरिक्त विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या शिवाय बेलगाम ते मऊ, वास्को दि गामा ते मुजफ्फरपूर दरम्यान देखील अतिरिक्त गाड्या चालवण्यात येणार आहेत. या अतिरिक्त रेल्वे गाड्यांमध्ये गर्दीच्या काळात रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

उन्हाळ्यामध्ये शाळांना सुट्टी राहत असल्याने रेल्वे प्रवाशांची संख्या प्रचंड वाढते. तीन महिन्यापूर्वीच रेल्वेचे आरक्षण 'फुल्ल' झाले. नागपूर-मुंबई, नागपूर-पुणे मार्गावर प्रवाशांची सर्वाधिक गर्दी असते. या पार्श्वभूमीवर रेल्वेने नियोजन केले. नागपूर ते पुणे साप्ताहिक वातानुकूलित विशेष गाडीच्या १४ फेऱ्या होणार आहेत. क्रमांक ०१४४० विशेष गाडी १३ एप्रिल ते २५ मेपर्यंत दर रविवार रोजी नागपूर येथून १६.१५ वाजता सुटेल आणि पुणे येथे सोमवार रोजी ०७.२० वाजता पोहोचेल. क्रमांक ०१४३९ विशेष गाडी १२ मार्च ते २४ मेपर्यंत दर शनिवार रोजी पुणे येथून १९.५५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे रविवार रोजी १४.४५ वाजता पोहोचेल. या गाडीला दौंड कॉर्ड लाइन, अहमदनगर, कोपरगांव, मनमाड, जळगांव, भुसावळ, मलकापूर, शेगांव, अकोला, बडनेरा, वर्धा येथे थांबा राहणार आहे. आठ वातानुकूलित द्वितीय, १० वातानुकूलित तृतीय आणि दोन जनरेटर कार अशी गाडीची संरचना राहणार आहे. या शिवाय बेलगाम ते मऊ साप्ताहिक विशेष गाडीच्या १२ फेऱ्या ६ एप्रिल ते ११ मेपर्यंत दर रविवारी होणार आहेत. क्रमांक ०७३२८ विशेष गाडी ०९ एप्रिल ते १४ मेपर्यंत दर बुधवार रोजी सुटणार आहे. वास्को दि गामा ते मुजफ्फरपूर साप्ताहिक विशेष गाडीच्या १८ फेऱ्या होणार आहेत. क्रमांक ०७३११ विशेष गाडी ०७ एप्रिल ते ०२ जूनपर्यंत दर सोमवार रोजी वास्को दि गामा येथून १६.०० वाजता सुटेल आणि मुजफ्फरपूर येथे बुधवार रोजी १२.३० वाजता पोहोचेल. क्रमांक ०७३१२ विशेष गाडी १० एप्रिल ते ०५ जूनपर्यंत दर गुरुवारी रोजी मुजफ्फरपूर येथून १४.४५ वाजता सुटेल आणि वास्को दि गामा येथे शनिवार रोजी १४.५५ वाजता पोहोचेल. या विशेष गाड्यांचा तपशीलवार वेळ, थांबा आणि आरक्षण करण्यासाठी रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे मध्य रेल्वे प्रशासनाकडून रेल्वे प्रवाशांना करण्यात आले आहे.

# अकोला ४४.२ अंशांवर; राज्यातील तापमानात झपाट्याने वाढ

एप्रिल महिन्याचा दुसरा आठवडा उजाडताच राज्यातील तापमानाचा पारा देखील उंचावला आहे. राज्यातील उन्हाची दाहकता वाढतच असून सोमवारी अकोला येथे राज्यातील सर्वाधिक ४४.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद अकोला येथे करण्यात आली. उन्हाळ्यातील या हंगामातील हे सर्वाधिक तापमान आहे.

राज्यात गेल्या आठवड्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली आणि वाढत्या तापमानाला थोडा 'ब्रेक' लागला. त्याआधी देखील राज्यातील तापमान ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. आता अवकाळी पावसाने उसंत घेताच वातावरण थंड होण्याऐवजी तापमानात झपाट्याने वाढ झाली. एप्रिल महिना जसजसा समोर सरकत आहे, तसतशी तापमानात झपाट्याने वाढ होत आहे. सोमवारी अकोल्यातील तापमान ४४.२ अंश सेल्सिअसवर पोहोचले. जिल्ह्याचे तापमान सरासरी तापमानापेक्षा चार अंश सेल्सिअस जास्त आहे. यासोबतच, हे



हंगामातील सर्वाधिक तापमान आहे. त्यापाठोपाठ ब्रम्हपूरी येथे ४३.८ तर अमरावती व चंद्रपूर येथे ४३.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद सोमवारी झाली.

उन्हाळ्यात सर्वाधिक तापमानाची नोंद दरवर्षीच विदर्भात होते. आताही उष्णतेचा कहर वाढत चालला आहे. हवामान खात्याने 'येलो अलर्ट' जाहीर केला आहे. तर पुढील काही दिवसात तापमान ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यताही वर्तवली आहे. गुजरात आणि वायव्य भारतातून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे विदर्भातील तापमान झपाट्याने वाढत आहे. विदर्भासह मध्य महाराष्ट्र आणि म राठवाड्यातील काही शहरांमध्ये तापम ान ४१ व ४२ अंश सेल्सिअसपलीकडे गेले आहे.

**हवामानात बदल...**

दक्षिणेकडे हवामानाच्या प्रणालीत बदल होण्यास सुरुवात झाली आहे. तर त्याचवेळी उत्तरेकडून देखील उष्ण वारे राज्याच्या दिशेने येऊ लागले आहेत. याचा एकत्रित परिणाम म्हणून किमान तापमानात वाढ होत आहे. विदर्भात या तापमानाचा कडाका अधिक आहे. अकोला, अमरावती, नागपूर, ब्रम्हपूरी, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ या शहरांमध्ये तापमान ४२ ते ४४ अंशं सेल्सिअसदरम्यान आहे. मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही शहरांम ध्येही पारा चांगलाच वाढत आहे. दरम्यान, येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये राज्यातील कमाल तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

**अवकाळी पाऊस...**

राज्यावरील अवकाळी पावसाचे संकट अजूनही थांबलेले नाही. तीन दिवसानंतर पून्हा एकदा अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यादरम्यान विजांचा कडकडाट, सोसायट्याचा वारा आणि वादळी हवामान महाराष्ट्रासह देशातील इतरही भागांमध्ये पाहायला मिळू शकतं. त्यामुळं यंदाच्या आठवड्याची सुरुवात उकाड्याने झाली असली तरीही शेवट मात्र अवकाळीने होणार असल्याचा प्राथमिक अंदाज सध्या वर्तवण्यात येत आहे.

# पत्नीसह सासुला जिवंत जाळण्याच्या प्रयत्नात कामगाराचा मृत्यू

**दि.०७, नाशिक :** पत्नी नांदावयास येत नसल्याच्या रागातून पत्नीसह सासुला जिवंत जाळण्याच्या प्रयत्नात कामगाराचा मृत्यू झाला. सिन्नर तालुक्यातील सोनारी येथे हा प्रकार घडला. याप्रकरणी सिन्नर पोलीस ठाण्यात सायंकाळी उशीरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. या घटनेत भाजलेल्या दोन्ही महिलांची प्रकृती गंभीर आहे.

सोनारी गावातील सोमनाथ शिंदे हे पत्नी अनिता आणि मुलगी



स्नेहल यांच्याबरोबर राहतात. स्नेहलचे लग्न सिन्नर औद्योगिक वसाहतीत राहणाऱ्या केदार हंडोरे याच्याशी सात महिन्यांपूर्वी झाले. काही दिवसांपासून स्नेहल आणि केदार यांच्यात वाद सुरु होते. यामुळे स्नेहल माहेरी राहण्यासाठी निघून आली होती. रविवारी सर्व आवराआवर झाल्यानंतर स्नेहल आईसह झोपली होती.

सोमनाथ शिंदे हे गच्चीत झोपले होते. मध्यरात्री केदार हा काही मित्रांबरोबर स्नेहलला घरी घेऊन जाण्यासाठी सोनारी येथे आला. यावेळी दोघांमध्ये पुन्हा वाद झाले. रागाच्या भरात केदारने स्वत:ला पेटवून घेत स्नेहल आणि सासु अनिता यांना मिठी मारली. दोघींना जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला. मदतीसाठी अनिता यांनी शेजारी राहणाऱ्या नातेवाईकांच्या घराचा दरवाजा ठोठावल्यावर सर्व प्रकार लक्षात आला. परिसरातील लोकांनी आग विझवत दोघांना वाचविण्याचा प्रयत्न केला. या घटनेत स्नेहल आणि अनिता या गंभीर भाजल्या असून त्यांना नाशिक येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. केदारचा रुग्णालयात मृत्यू झाला. सोमवारी सायंकाळी उशीरापर्यंत या प्रकरणी सिन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याचे काम सुरू होते.

## संपादकीय



### शास्त्रज्ञ डॉ.शंकर आबाजी भिसे

स्वातंत्र्यपूर्व काळातील थोर भारतीय संशोधक डॉ शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी. त्यांचा जन्म २९ एप्रिल १८६७ रोजी मुंबईत झाला. भारताचे एडिसन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ शंकर आबाजी भिसे या महान शास्त्रज्ञाचा जन्म मुंबईमध्ये एका मॅजिस्ट्रेटच्या घरी झाला. दोनशेच्यावर निरनिराळे शोध लावणारे आणि चाळीसहून अधिक शोधांचे एकस्व संपादन करणाऱ्या डॉ शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी असल्याने त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे तरीही त्यांचा विसर पडणाऱ्यांचीच संख्या यंदाही अधिक असेल. ज्या काळात भारतीय नागरिकांना कमी लेखले जात होते त्याकाळात डॉ भिसे यांनी संशोधनक्षेत्रात अजोड कार्य केले. लहानपणी एकदा भिसे साखर आणायला वाण्याकडे गेले. त्यावेळी वाण्यानी लबाडी करून कमी वजनाची साखर दिल्याचं त्यांच्या लक्षात आलं. याबाबत त्यांनी व्यापाऱ्याला विचारलं असता माझ्या काट्यावर विश्वास नसेल तर आपोआप वजन करणारं यंत्र शोधून काढ. असं वाण्याने त्यांना खोचकपणे म्हटलं. त्यावेळी एक दिवस तुला असे यंत्र देईन अस छोटा शंकर त्यांना आत्मविश्वासाने म्हणाला. लहानपणापासून संशोधनाची आवड असणाऱ्या डॉ भिसे यांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी दगडी कोळशापासून गॅस शुद्ध करण्याचे यंत्र बनवले. १८९७ मध्ये इन्व्हेंटर रिव्हीव अँड सायंटिफिक रेकॉर्ड या मासिकाने स्वयंमापन यंत्र करण्याची एक स्पर्धा जाहीर केली. स्वयंमापन यंत्र म्हणजे साखर, पीठ इत्यादी वस्तूंचे गिऱ्हाईकाला हवं तेवढं वजन करुन देणारं यंत्र. डॉ भिसे यांनी अशा यंत्राचा आराखडा तयार करून पाठवला. त्यांनी तयार केलेल्या वजन मापन यंत्राच्या आराखड्याला इंग्लंडमध्ये पहिले बक्षीस मिळाले. या स्पर्धेत युरोप आणि अमेरिकेतल्या नामांकित यंत्र शास्त्रज्ञांनी भाग घेतला होता हे विशेष. इंग्लंडमध्ये गेल्यावर त्यांनी छपाईच्या क्षेत्रात अनेक शोध लावले. १९०० साली डॉ भिसे यांचं लक्ष मुद्रण व्यवसायातील यंत्र सामग्रीकडे लागलं. त्या काळी प्रचलित असलेल्या लायनो, मोनो इत्यादी यंत्राची रचना आणि कालमर्यादा यांचा अभ्यास करुन त्यांनी भिसो टाईप या यंत्राचा शोध लावला व त्याचं प्रथम इंग्लंडमध्ये आणि नंतर अमेरिक, जर्मनी, फ्रांस या देशांमध्ये पेटंट घेतले. या यंत्राच्या उत्पादनासाठी सर रतनजी टाटा यांचे सहकार्य मिळवून द टाटा भिसे इन्व्हेशन ही कंपनी १९१० मध्ये लंडन येथे स्थापन केली. पण १९१५ मध्ये ती बंद पडली. त्याच सुमारास दर मिनिटाला साधारण बाराशे अक्षर छापणारं गुणीत मातृका हे यंत्र तयार केलं आणि १९१६ मध्ये विक्रीला आणलं. १९१६ साली भिसे अमेरिकेला गेले तिथे त्यांनी युनिव्हर्सल टाईप क्लस्टर हे यंत्र शोधून काढले आणि अमेरिकेत त्याचं पेटंट घेतले. याशिवाय मुद्रण व्यवसायातली आणखी अनेक यंत्रे त्यांनी तयार केली. १९१० साली साली डॉ भिसे आजारी असताना त्यांच्यावर उपचार करण्यासाठी वापरण्यात आलेलं एक भारतीय औषध फार गुणकारी ठरलं. या औषधाचं रासायनिक पृथःकरण त्यांनी करवून घेतलं आणि त्याच्या गुणकारीपणा आयोडीनामुळे आहे जाणलं. १९१४ साली डॉ शंकर आबाजी भिसे यांनी स्वतःच एक नवीन औषध तयार केले आणि त्या औषधाला बेसलिन हे नाव दिले. हे औषध बाह्योपचारासाठी उपयुक्त ठरले. पहिल्या महायुद्धात या औषधाचा अमेरिकेने मोठ्या प्रमाणात वापर केला. या औषधामुळे पहिल्या महायुद्धात अनेक सैनिकांचे प्राण वाचले. या औषधावर आणखी संशोधन करून आयोडीन घटक असलेलं पण पोटात घेता येईल असं एक औषध नंतर डॉ भिसेंनी तयार केलं या औषधाला ऑटोमेडीयन असं नाव दिलं. हे औषध बऱ्याच रोगांवर उपयुक्त ठरले. पुढे त्यांनी कपडे धुण्यासाठी एक नवे संयुग तयार केले. डॉ भिसे यांनी विद्युत शास्त्रातही अनेक शोध लावले. डॉ भिसे यांच्या साठाव्या वाढदिवशी इंग्लंडमध्ये त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. या सुमारास त्यांची महान शास्त्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन यांच्याशी भेट झाली. एडिसन यांनीही त्यांच्या संशोधन कार्याचा गौरव केला. डॉ भिसे इंग्लंडमध्ये असताना इंग्लंडचे आफ्रिकेशी युद्ध सुरू झाले. स्वयंचलित तोफा काढण्याची विनंती तेथील कारखानदारांनी डॉ भिसे यांना केली. त्यासाठी डॉ भिसे यांना त्यांनी खूप पैसे देऊ केले, पण आपले संशोधन हे विश्वाच्या कल्याणासाठी असून आपल्या संशोधनातून विश्वाचा संहार होऊ नये अशी त्यांची मानवतावादी भूमिका होती. म्हणूनच त्यांनी ही मागणी नम्रतापूर्वक नाकारली. डॉ भिसे यांनी सुमारे २०० शोध लावले. त्यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे ७ एप्रिल १९३५ रोजी या महान शास्त्रज्ञाचे निधन झाले. संशोधन क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. शासनाने त्यांच्या या महान संशोधकाच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन गौरव करावा.

## ट्रम्प यांच्या विरुद्ध ' हॅण्डस ऑफ'



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर येऊन जेमतेम तीन महिने झाले. या तीन महिन्यातच अमेरिकन जनता त्यांना वैतागली असल्याचे दिसून येत आहे. ज्या अमेरिकन जनतेने तीन महिन्यापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना भरभरून मते देऊन राष्ट्राध्यक्ष बनवले तीच अमेरिकन जनता आता त्यांच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहे. विशेष म्हणजे ही आंदोलने फक्त एका शहरात किंवा राज्यात होत आहेत असे नाही तर अमेरिकेतील सर्वच्या सर्व म्हणजे पन्नास राज्यातील बाराशे शहरात होत आहेत आणि त्यात लाखो अमेरिकन नागरिक सहभागी होत आहेत. आंदोलकांनी या आंदोलनाला 'हॅण्डस ऑफ' आंदोलन असे नाव दिले असून हे आंदोलन लोकशाहीसाठी असल्याचे सांगितले जात असून या आंदोलनात अमेरिकेतील दीडशे पेक्षा जास्त गटांनी सहभाग घेतला असून त्यात सामाजिक हक्क संघटना, कामगार संघटना, एलजीबिटीक्यू प्लस समर्थक गट, सामाजिक आणि लोकशाहीवादी गटांचा समावेश आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधातले हे आंदोलन शांततेच्या म ार्गाने चालू असल्याने कोणालाही अटक करण्यात आली नाही. मात्र या आंदोलनामुळे अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांची जगभर अप्रतिष्ठा झाली आहे हे मात्र नक्की. आंदोलकांनी केवळ डोनाल्ड ट्रम्प यांच्याच विरोधात नव्हे तर त्यांचे सहाय्यक ॲलन मस्क यांच्या विरोधातही घोषणा दिल्या आहेत. तीन महिन्यांपूर्वी ज्या डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेने सत्तेवर बसवले त्यांच्याच विरोधात जनतेला रस्त्यांवर का उतरावे लागत आहे असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर आहे ट्रम्प यांचा एककल्ली आणि मनमानी कारभार. राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे पण हे निर्णय घेताना त्यांनी अनेकांना दुखावले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी इतर देशातून आयात होणाऱ्या मालांवर भरमसाठ कर लावला आहे. हे करताना त्यांनी अमेरिकेचेच भले होणार असे जनतेला ठासून सांगितले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयाला मेक्सिको, चीन, भारत, कॅनडा या देशांनीही जशास तसे उत्तर देऊन अमेरिकेतून आयात होणाऱ्या मालांवर तितकाच अतिरिक्त कर लावला आहे त्यामुळे जगात व्यापार युद्धाला तोंड फुटले आहे याचा परिणाम जितका जगावर होणार आहे तितकाच तो अमेरिकेवर देखील होणार आहे. या व्यापार युद्धामुळे अमेरिकन बाजारपेठेत मंदी येण्याची भीती तेथील तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. जर अमेरिकेत मंदी आली तर अमेरिकेत महागाई वाढेल त्याचा फटका तेथील सर्वसामान्य नागरिकांनच बसेल त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांचा हा निर्णय तेथील सर्वसामान्य लोकांना पटलेला नाही. केवळ हा एकमेव निर्णय नाही तर गेल्या काही दिवसात ट्रम्प यांनी घेतलेले अनेक निर्णय जनतेच्या पचनी पडले नाहीत त्यात हजारो केंद्रीय कर्मचाऱ्यांची कपात, सामाजिक सुरक्षा व्यवस्थापन कार्यालये बंद करणे, मदत एजेंसी बंद करणे, स्थलांतरितांना हद्दपार करणे, तृतीय पंथीयांच्या कामाच्या संधी कमी करणे, आरोग्य कार्यक्रमांच्या निधीमध्ये कमी करणे हे आणि यासारखे अनेक निर्णय अमेरिकेतील जनतेला पटले नाहीत या निर्णयांना विरोध करण्यासाठीच अमेरिकन जनता रस्त्यावर उतरली आहे. जनतेचा वाढता रोष कमी करण्यासाठी व्हाईट हाऊस पुढे सरसावली आहे मात्र त्याचा आंदोलकांवर कोणताही परिणाम होताना दिसत नाही. आंदोलनाची धग वाढतच चालली आहे. एककल्ली, मनमानी कारभार केला तर जनता ती खपवून घेत नाही हेच या आंदोलनातून अमेरिकन जनतेने दाखवून दिले आहे. हे आंदोलन जर असेच चालू राहिले तर डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेपुढे झुकावेच लागेल आणि आपल्या एककल्ली स्वभावाला मुरड घालून जनतेच्या हिताचे असे सर्वसमावेशक निर्णय घ्यावे लागेल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## चंद्रपुरात चैत्र पोर्णिमेनिमित्त महाकाली परिसरात ५१ फुट ध्वजाचे ध्वजारोहण




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, चंद्रपूर :** आ. किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून चैत्र पोर्णिमेनिमित्त भारतीय जनता पार्टी चंद्रपूर विधानसभा व श्री महाकाली माता महोत्सव ट्रस्ट यांच्या वतीने सकाळी ८ वाजता श्री महाकाली मंदिर परिसरात १०१ माता भक्तांच्या हस्ते ५१ फुट उंच ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी माता महाकालीची चांदीची मूर्ती, रथ आणि पालखीचे विधीवत पुजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे आ. किशोर जोरगेवार, मनिष महाराज, सुनिल महाकाले, श्री महाकाली माता ट्रस्टचे सचिव अजय जयस्वाल, विश्वस्त श्याम धोपटे, मिलिंद गंपावार, राजू शास्त्रीकरिता, तुषार सोम, भाजपच्या माजी नगरसेविका छबू वैरागडे, कल्पना बबुलकर, प्रदिप किरमे, वंदना हातगावकर, संजय बुराघाटे, अरुण तिखे, राजेंद्र खांडेकर, अनिल टहलानी, जितेश कुळमेथे, निलिमा वनकर, कल्पना शिंदे, दुर्गा वैरागडे, रुपा परसराम, वंदना हजारे, अनिता झाडे, चंपा विश्वास, दिक्षा सातपुते, चंदा इटनकर, अस्मिता डोनारकर, आशा देशमुख, नितीन शाहा, कालिदास धामनगे, करणसिंग बैस, प्रवीण गिलबीले, मुन्ना जोगी, संजय महाकालीवार, सुमित बेले, कालास धायगुने, चंद्रकांत बातव, प्रशांत द्विवेदी आदींची उपस्थिती होती. यावेळी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. उत्सवाला चंद्रपूर विधानसभा क्षेत्रातील महिला, पुरुष, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. महाकाली माता ही शक्ती, श्रद्धा आणि संस्कृतीचे प्रतिक आहे.

चैत्र पोर्णिमेनिमित्त आपण येथे एकत्र आलो आहोत, हे केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक एकतेचे प्रतिक आहे. ५१ फुट उंच ध्वज हा आपल्या भक्तीची आणि परंपरेची साक्ष आहे. हजारो भक्तांनी दिलेला भावपूर्ण सहभाग, चंद्रपूरची सांस्कृतिक श्रीमंती दर्शविणारा आहे. दरवर्षी नवरात्रात आपण महाकाली महोत्सव साजरा करतो. यावेळी रथातून मातेची भव्य पालखी मिरवणूक निघते. चैत्र यात्रेत येणाऱ्या भाविकांना दर्शन घेता यावे, यासाठी रथ आणि पालखीची विधीवत पुजा करुन ती दर्शनासाठी ठेवण्यात आल्याचे आ. किशोर जोरगेवार यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमाला मातेच्या भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## पुलाचा कठडा अपघाताला आमंत्रण...

**अक्षराज : धीरज महांगरे**

**दि.०७, हडपसर :** हडपसर गाव हे गाडीतळ यांना जोडणारा जो उड्डाणपूल आहे ज्याची सुरुवात भोसले गार्डन पासून होते, हा उड्डाणपूल सुरू जिथून होतो तिथे पुरेसा प्रकाश तर नाहीच, पण जो पूलाचा कठडा आहे तो व्यवस्थित दिसत नाही, त्यामुळे आजपर्यंत अनेक अपघात कठड्याला धडक बसून झालेले आहेत, वारंवार ही बाब महापालिकेच्या निदर्शनास येऊन सुद्धा याकडे का दुर्लक्ष केले जात आहे हेच कळत नाही, हडपसर म्हणजे अपघाताला निमंत्रण असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही, संबंधित विभाग किंवा संबंधित अधिकारी याची दखल का घेत नाही हे आज तागायत कळले नाही, अजून किती अपघात झाल्यानंतर यावर कारवाई होईल, पुण्यातील लोकांनाच या स्पॉटला गेल्यावर कळत नाही की तिथे पुल स्टार्ट कुठून होतो म्हणून तर बाहेरील जिल्ह्यातून गाडी आली असता त्यांना तर काहीच कळत नाही,अन् याचमुळे अनेक अपघात होतात, यावर उपाय म्हणून तिथे ब्लिंकिंग येलो लाईट लावावा, त्यामुळे कोणताही वाहन चालक अलर्ट होईल आणि त्याला समजेल की इथे काहीतरी आहे, इथून उड्डाणपूल सुरु होत आहे, अशी लाईट लावल्यामुळे निश्चितच जीवित हानी होणार नाही, अनेक वेळा अपघात होऊनही जर कोणी दखल घेत नसेल तर यासाठी नागरिकांनी रस्त्यावर उतरावे का असा प्रश्न जनतेपुढे येतो आहे.

## कर्तव्यशून्य..

राजकर्ते फक्त दोषी
संबंध लावे अन्योन्य
इच्छा सत्ता बदलार्थ
विरोधक मानी धन्य

जबाबदारी सर्वांचीचं
आम्हां नसते हे मान्य
हतबल होवून विचारे
काय करेलं सामान्य

झापड लावे बुध्दीला
फिरतात श्वापदे वन्य
काय करायचे आम्हां
वृत्ती का कर्तव्यशून्य

घडता अघटीत तेंव्हा
घेऊन निघालो सैन्य
दाटला स्नेह उमाळा
पडतो प्रश्नांचापर्जन्य

त्रासले पीडीत कुटुंब
आम्हां नसते सौजन्य
दिखावामाणूसकीचा
फोटोसेल्फी शतधन्य

ओघ लागती मदतीचे
दावत औदार्य वदान्य
अकारण करे उपकृत
शोधत राहतो रे दान्य

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

## पॉक्सो गुन्हेगारांना फाशीचे प्रावधान हवे !

बेळगाव येथील चार वर्षांच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या निसार अहमद फक्रुसाब चापगावी नावाच्या ६८ वर्षीय नराधमाला न्यायालयाने नुकतीच २० वर्षांची कारावासाची शिक्षा सुनावली. २४ फेब्रुवारी २०२४ रोजी नंदगड पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली होती.

निसार याने चार वर्षाच्या मुलीला चॉकलेटचे आमीष दाखवून निर्जन स्थळी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या प्रकरणी त्याच्याविरुद्ध नंदगड पोलीस ठाण्यात 'पॉक्सो' कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला होता. मागील महिन्यात सांगलीतील जतमध्ये १३ वर्षीय मुलीवर ४ वर्षे अत्याचार केल्याप्रकरणी तिच्या बापाला अटक करण्यात आली. नाशिकमध्ये एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटनाही मागच्याच महिन्यात वाचनात आली. तर मुरुडमध्ये रंगपंचमीच्या दिवशी शाळेतील शिक्षकाने वर्गातील मुलीचा विनयभंग केल्याची घटना प्रसिद्ध झाली होती. गेल्या काही वर्षांत लहान मुला-मुलींवरील अत्याचारात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. अशा गुन्ह्यांची नोंद पॉक्सो कायद्याच्या अंतर्गत केली जाते. अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर चाप बसण्यासाठी पॉक्सो कायद्यांतर्गत होणाऱ्या शिक्षा पूर्वीच्या तुलनेत अधिक कडक केल्या गेल्या असल्याचे म्हटले जाते. मात्र तरीही या गुन्ह्यांत घट न होता उलट वाढ होत आहे. अशा स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये अनेकदा लहान मुलांचे नातेवाईक, शेजारी-पाजारी, शाळेतील कर्मचारी सहभागी असतात. आपली वासना शमवण्यासाठी मुलांच्या निरागसतेचा गैरफायदा घेतला जातो.

भारताचे भविष्य असणाऱ्या लहान मुलांच्या आयुष्याची राखरांगोळी करणाऱ्या या नराधमांना खरेतर फाशीची शिक्षा द्यायला हवी. उपरोक्त घटनेतही न्यायालयाने शिक्षा देण्यास १ वर्षाहून अधिक काळ घेतला आहे. या काळात न्यायालयाच्या तारखांवर तारखा पडतात, त्यासाठी मुलांच्या नातेवाईकांना न्यायालयाच्या खेपा माराव्या लागतात. ज्यामध्ये त्यांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे अशा प्रकारचे गुन्हे जलदगती न्यायालयात चालवून गुन्हेगाराला फाशीच्या शिक्षेचे प्रावधान करण्यात यावे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

## पथदिव्यांची देखभाल दुरुस्ती वाऱ्यावर ; हदगावकरांना सोसावी लागते अंधार यात्रा



**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.०७, हदगाव (नांदेड) :** येथील मुख्य रस्त्यावरील गिरिराज मेडिकल ते छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार उमरखेड फाट्यापर्यंत हदगाव शहरातील वैभवात सौंदर्यात कात टाकणारी मुख्य रस्त्यावरचे पथ दिव्यांच्या देखभाल दुरुस्ती बाबत हदगाव नगर परिषदेचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळेच की काय ? शहरवासीयांना व इथले व्यापाऱ्यांना जाच सोसावा लागत आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) विभागातील अति मागास नगर परिषद म्हणून हदगावची नगरपरिषदला पाहिली जात आहे नांदेड जिल्ह्यातील (क) वर्ग दर्जा प्राप्त असलेली हदगाव नगरपरिषद प्रशासनात कमी मनुष्यबळ व अपुरे कर्मचारी वर्ग असल्याने नागरिकांच्या समस्येकडे दुर्लक्ष होताना दिसून आले आहे. शहरातील शिवनेरी मेडिकल ते छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार उमरखेड फाटा पर्यंत दुभाजक पथदिवे हे शोभेची वस्तू बनलेली अवस्थेत असल्याने अडचण नसून खोळंबा होत आहे. त्याचेच एक धक्कादायक बाब म्हणजे नगरपरिषदेकडून महावितरणला ७० लाख थकबाकीचा नगरपरिषदेवर बोजा असल्याने संबंधित नगरपरिषद प्रशासनाने ७० लाख थकबाकीचा कारण देत असल्याचे समोर आले आहे. मात्र शहरातील व्यापारी व नागरिकांना रात्री बे रात्री मॉर्निंग वॉक करताना दुभाजक पथदिवे बंद अवस्थेत असल्याने संताप व्यक्त होत आहे. गेल्या दीड वर्षापासून अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. भविष्यात हदगावकरांना दुभाजक वरील पथ दिव्यांची झगमगाट पाहण्यासाठी अजून किती दिवसांची प्रतीक्षा करावी लागत आहे. असे सर्वसामान्य जनतेतून जोर करत आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायलयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

## पोलीस आयुक्त डुंबरे यांच्या संकल्पनेतून एक खिडकी योजनेचा शुभारंभ



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०७, ठाणे :** मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनाच्या सर्व विभागांना जनतेची कामे सुलभरित्या व तत्परतेने पार पाडण्यासाठी १०० दिवस कृती आराखडा दिलेला आहे. त्यास अनुसरून पोलीस आयुक्त, ठाणे शहरआशुतोष डुंबरे यांचे संकल्पनेतुन दिनांक ०७.०४.२०२५ रोजी पासुन पोलीस आयुक्त कार्यालय, तळ मजला, ठाणे या ठिकाणी 'एक खिडकी योजना' कार्यान्वित करण्यात आली आहे. एक खिडकी योजनेअंतर्गत पोलीस आयुक्त कार्यालयास नागरिकांकडून प्राप्त होणारे अर्ज, प्रस्ताव तसेच वरिष्ठ कार्यालय टपाल, न्यायालयीन टपाल यांची वेळेत पुर्तता करणे तसेच पोलीस आयुक्त कार्यालयातील परवाना शाखेतुन देण्यात येणारे सर्व प्रकारचे परवाने व नाहरकत दाखले हे एकाच ठिकाणी मुदतीत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरीकांची कामे वेळेत व सुलभतेने होण्यास मदत होणार आहे.

## सुरेश खोसे यांना राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०६, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील पाडळी दर्या येथील पत्रकार व महाराष्ट्र राज्य संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य व नगर जिल्हा सचिव सुरेश खोसे पाटील यांना राष्ट्रीय लोकराज्य न्यूज मीडिया समूहाच्या वतीने राज्य स्तरीय आदर्श पत्रकार हा पुरस्कार काल रविवार दि.६ रोजी थेऊर गणपती येथे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

पारनेर तालुक्यात विविध वृत्तपत्रांसाठी ग्रामीण प्रतिनिधी म्हणून १९९२ पासून काम करतात. त्यांच्या पत्रकारितेच्या लेखनीतून ग्रामीण भागातील अनेक प्रश्नांना वाचा फोडून अंधारातील प्रश्न प्रकाशात आणले गेल्याने त्या सोडण्यास मदत झाली आहे. त्यामुळे पारनेर तालुक्यात त्यांचा चांगला नावलौकिक आहे.

पत्रकारिता करताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघात पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यासाठी कार्यरत झाल्याने त्यांची प्रथम पारनेर तालुका उपाध्यक्ष पदी, नंतर अहिल्यानगर जिल्हा सचिव पदी व नुकतीच दोन महिन्यांपूर्वी त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना संघटनेच्या वरिष्ठांनी राज्य संघटनेत प्रदेश कार्यकारिणी सदस्य म्हणून काम करण्याची संधी दिली. हे करत असताना पत्रकारिते कडे त्यांनी दुर्लक्ष होवून न देता पत्रकारितेच्या लेखनी ची धार कमी होवू न देता, सातत्याने बातमीदारी करत असतात, म्हणून राज्यस्तर वर काम करणाऱ्या राष्ट्रीय लोकराज्य न्यूज मीडिया समूहाने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना राज्य स्तरीय आदर्श पत्रकार हा मानाचा पुरस्कार फेटा, प्रमाणपत्र, सन्मान चिन्ह, मेडल प्रसिद्ध चित्रपट अभिनेते, खंडोबा फेम कलाकार महेश देवकाते, अभिनेत्री निलोफर पठाण, अभिनेत्री प्राची पालवे व राष्ट्रीय लोकराज्य न्यूज मीडिया समूहाचे मुख्य संपादक राहूल कुदनर यांच्या हस्ते व प्रसिद्ध उद्योजक ज्ञानदेव लंके, सेवानिवृत्त प्राचार्य रामचंद्र सुपेकर, ॲड. सोमनाथ गोपाळे, प्रकाश शेळके, संदीप लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मान पूर्वक प्रदान करण्यात आला.

## सोमा नेवरेकर यांचे दुःखद निधन



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०७, चिपळूण :** चिपळूण तालुक्यातील मुर्तवडे कातळवाडी गावचे रहिवाशी सोमा मालू नेवरेकर यांचे वयाच्या ७३ व्या वर्षी दुःखद निधन झाले.

शनिवार दि.५ एप्रिल २०२५ रोजी रात्रौ १०.३० वाजण्याच्या सुमारास त्यांनी विरार येथील रेडियंट हॉस्पिटल मध्ये अखेरचा श्वास घेतला.प्रकृती बरी नसल्याने ते विरार येथील आरुष हॉस्पिटल येथे उपचार घेत होते. डिस्चार्ज घेण्यादरम्यान पुन्हा त्यांची तब्बेत नादुरुस्त वाटली. तेथून त्यांना त्वरित बाजूच्या रेडीयंट हॉस्पिटल येथे हळविण्यात आले. मात्र त्यांनी उपचार दरम्यान अधिक साथ दिली नाही. अखेरीस त्यांची प्राणज्योत मालवली.

स्व.सोमा मा.नेवरेकर हे कातळवाडी गावचे जेष्ठ व्यक्तिमत्व होते.त्यांचे वडील गावचे कारभारी तर बंधू स्व. धाकटु नेवरेकर हे माजी उपसरपंच असल्याने कुटुंबाची एक आगळीक ओळख गांव - वाडी सह पंचक्रोशीत होती. गावच्या नमन कलेत हौशीने सहभागी होणारे ते एक विनोदी कलावंत होते.सार्वजनिक कामात पुढाकार व रोखठोक वक्तव्य,प्रचंड मेहनती व तितकंच संयमी पणाचे हे व्यक्तिमत्व होते. त्यांच्या निधनाचे बातमीने सारी पंचक्रोशी सुन्न झाली आहे. त्यांच्या पार्थिवावर रविवार दि.६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी फुलपाडा स्मशानभूमी, विरार (पूर्व) येथे अंतिमसंस्कार करण्यात आले.

## राजमाता पतसंस्थेच्या चेअरमन पदी शिवाजीराव कदम तर व्हा. चेअरमन सुशांत ठाकर



**अक्षराज : राहुल शिंदे**

**दि.०७, पेठवडगाव :** हातकणंगले तालुक्यातील पेठ वडगाव येथील राजमाता जिल्हा नागरी पतसंस्था मर्यादित कोल्हापूर पेठ वडगाव. या संस्थेची १३ जागेसाठी पंचवार्षिक निवडणूक विरोधात पार पडली. यावेळी चेअरमन म्हणून शिवाजीराव कदम तर व्हाईस चेअरमन सुशांत ठाकर यांची बिनविरोध निवड झाली. हातकणंगले उपनिबंधक कार्यालयाचे मुख्य लिपिक सुरेश नाईक यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. त्यांच्या हस्ते नवनिर्वाचित चेअरमन शिवाजीराव कदम तर व्हाईस चेअरमन सुशांत ठाकर तसेच मावळचे चेअरमन वामनराव चव्हाण व संस्थापक अण्णासाहेब रोकडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संजय रोकडे, रावसाहेब शिंगे, सचिन ताटे, संजय बनसोडे, सुप्रिया गायकवाड,कोमल यादव, अक्षय मदने, विजय कदम नितीन यादव, समीर मुजावर, राहुल शिंदे तसेच सर्व नवनिर्वाचित संचालक उपस्थित होते.

## वृद्ध महिलेच्या गुन्ह्यातील आरोपीला खडकपाडा पोलिसांनी केली अटक..

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०६, कल्याण (ठाणे) :** खडकपाडा पोलीस ठाण्याचे हद्दीत दि.२० रोजी रंजना चंद्रकांत पाटकर वय ६० वर्ष रा. आटाळी आंबिवली कल्याण पश्चिम. यांच्या राहता घरी अज्ञात मारेकरी यांनी जबरदस्तीने चोरी करून रंजना पाटकर या वृद्ध महिलेचे खून केल्याबद्दल त्यांचा भाचा हर्षल प्रेमानंद पाटकर यांनी खडकपाडा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून खडकपाडा पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर २५३/२०२५ भारतीय न्याय संहिता १०३ (१)३१९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले होते.

सदर गुन्ह्याची तपास काही धागा दोरा नसताना तपास पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदारांनी आपल्या गुप्त बातमीद्वारे माहिती काढून गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या आरोपी चंदा उर्फ अकबर मोहम्मद शेख वय ३० अंबिवली कल्याण पश्चिम मिळालेल्या गोपनीय माहिती आधारे त्याला ताब्यात घेऊन सखोल तपास केल्यानंतर त्याच्याकडे असलेले जबरीने चोरी केलेले१,०५,०००/- रुपयाचे किमतीचे मुद्देमाल हस्तगत करून आरोपीला अटक करण्यात आली. हा आरोपी चांद अकबर मोहम्मद शेख हा घटनास्थळाचे परिसरामध्ये राहत असून मोमोज विक्री व्यवसाय सुरू करण्यासाठी पैसे हवे असल्याने त्यांनी हे जबरी चोरी करण्याचे उद्देशाने मयतेचे घरी काही



दिवसापासून नजर ठेवत होता. वेळ प्रसंग साधून मयत रंजन पाटकर यांच्या घरात एकटाच असताना आरोपीने त्यांच्याकडे पिण्याचे पाणी मागितले असता ते आत गेले असताना आरोपीने फिर्यादीचे घरात प्रवेश करून हॉलमध्ये टीव्हीचा आवाज वाढविल्यानंतर मयत यांनी अरडा ओरडा करू नये म्हणून हाताने तोंड दाबून जमिनीवर आपटून गळा दाबून जीवे ठार मारले. त्यानंतर त्या मयतीचे गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र व कानातील सोन्याचे असे एकूण मुद्देमाल १,०५,०००/-रुपये किमतीचे चोरी करून आरोपी त्या ठिकाणी फरार झाला. चंदा उर्फ अकबर मोहम्मद शेख यांचा यापूर्वी कोळशेवाडी पोलीस स्टेशन गुन्हे रजिस्टर क्रमांक १२२/२०२५ भा.द.वि.सं.क ३०२,२०१,४६०,३४ मध्ये आधारवाडी कारागृह बंदी होता आठ महिन्यापूर्वी सदर आरोपी हा कारागृहात बाहेर येऊन मानेगाव अटाळी कल्याण पश्चिम येथे राहत होता. त्यानंतर त्यांनी सदर गुन्हा केला असून त्याला जबरी चोरी गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.सध्या खडकपाडा पोलीस खाण्याचे पोलीस कोठडीमध्ये आहे. खडकपाडा पोलीसांनी तपास यंत्रणाकडे काही धागा दोरा नसतानाही हे तपास उत्तम प्रकारे व कौशल्याने पार पाडले.

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस आयुक्त आशुतोश डुंबरे,पोलीस सह आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त. पुर्व प्रादेशिक विभाग, अजय जाधव, पोलीस उपायुक्त परिमंडळ ३. कल्याण अतुल झेंडे, सहायक पोलीस आयुक्त कल्याण विभाग कल्याणजी घेटे तपासकामी मागदर्शक सुचना दिल्या होत्या गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक गुन्हे संदीप शिवले नेम. खडकपाडा पोलीस ठाणे करीत आहेत, सदरची कामगिरी खडकपाडा पोलीस ठाणे तपास पथकातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे, पोलीस निरीक्षक गुन्हे संदीप शिवले, सपोनि विजय गायकवाड, सपोनि अनिल गायकवाड, पो.उप निरी. अर्जुन दांडेगावकर, स पोउपनि. सुधीर पाटील, पो. हवा / राजु लोखंडे, योगेश बुधकर, कुंदन भामरे, संदीप भोईर, विनोद कामडी, किरण शिर्के, संजय चव्हाण, ज्योती देसले, पो.शि./ ललीत शिंदे, महेश बगाड, राहुल शिंदे, अविनाश पाटील, अनता देसले, सुरज खडाळे, मनोहर भोईर, र भोईर, धनराज तरे यांनी केली आहेत.

## घरकुल लाभार्थींना ९० दिवसापेक्षा अधिक मुदतवाढ द्यावी - सरपंच जनार्दन आंबेकर

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०७, गुहागर :** शासनाच्या माध्यमातून दरवर्षी प्रधानमंत्री आवास,रमाई आवास,मोदी आवास आणि इतर घरकुल आवाज योजनेंतर्गत निकषांनुसार बेघर, विधवा निराधार, दगड- मातीची कच्चे घर, आर्थिक दुर्बल घटक तसेच मागासवर्गीय पात्र लाभार्थांना घरकुले दिली जातात.

यावर्षी सुद्धा निकषांनुसार संबंधित लाभार्थीना घरकुले मंजूर झालेली आहेत. शासकीय नियमानुसार सदर घरकुले मंजूर झाल्यावर संबंधित लाभार्थींनी ९० दिवसांत घरकुल बांधून पुर्ण करणे आवश्यक आहे. परंतु सद्या वाळू उपलब्ध नसल्याने बांधकामे करण्यास अडथळा येत आहे.

महाराष्ट्र राज्यात युतीचे सरकार आल्यानंतर अंदाधुंदी बोकाळलेल्या चोरटी व अवैध वाळू व्यवसाय करणाऱ्या वाळू माफियांवर जरब बसवून अंकुश ठेवण्यासाठी महसुल विभागाने कडक धोरण राबविल्याने वाळू माफियांवर बंधने आल्याने अवैध वाळू उपसा थांबला आहे. हे एक चांगले काम युती सरकारच्या महसूल विभागाने केलेले आहे. त्यामुळे वाळू उपलब्ध होत नसून प्रचंड तुटवडा जाणवतो आहे. साहजिकच पात्र लाभार्थांची घरकुल बांधकामे रखडणार आहेत.



वास्तविक अवैध वाळू उपशावर निर्बंध आणल्यावर शासनाच्या महसुल विभागातर्फे सदर घरकुल पात्र लाभार्थांना प्रत्येकी पाच ब्रास रेती शासकीय भावाने उपलब्ध करून दिली जाईल असे महसूल विभागाचे धोरण आहे. परंतु तशा प्रकारे अजून पर्यंत वाळू उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे पात्र लाभार्थांची घरकुले ९० दिवसांत बांधून होणे कठीण काम होत आहे.

आधीच सद्या कडक उन्हाळा सूरू झालेला आहे. पाणी टंचाई अनेक गावांतून उद्भवत आहे. त्यात वाळूची वेळेवर नसलेली उपलब्धता आणि लाडकी बहिण योजनेंतर्गत महिलांना मिळत असलेले महीना रू.१५००/- यामुळे मोलमजुरांचा तुटवडा इत्यादी अडचणींमुळे शासनाने पात्र घरकुल लाभार्थींना ९० दिवसांपेक्षा अधिक मुदतवाढ द्यावी अशी मागणी गुहागर तालुक्यातील ग्रामपंचायत उमराठचे सरपंच जनार्दन आंबेकर यांनी शासनाकडे केली आहे.

## दिवा शहरात ठाकरे गटाकडून प्रभू श्री रामचंद्राच्या महाआरतीचे आयोजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, दिवा (ठाणे) :** प्रभू श्रीराम नवमी निमित्त दिव्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष्या कडून महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच दिवा स्टेशन बाहेर भव्य प्रभू श्री रामचंद्राची मूर्ती उभारली असून त्याची पूजा करून प्रभू श्रीरामाचा पाळणा देखील गायला. यावेळी भाविकांनी दिवेकरांनी पूजा आणि आरतीसाठी गर्दी केली होती. या कार्यक्रमाचे आयोजन दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे, दिवा शहर संघटिका ज्योती पाटील, महिला विभाग संघटिका मयुरी पोरजी यांनी केले होते. महाआरतीला कल्याण जिल्हा संघटक तात्या माने, जिल्हा महिला संघटिका वैशालीताई राणे दरेकर, विधानसभा संघटिका योगिता नाईक, शहर प्रमुख सचिन पाटील, उपशहर प्रमुख तेजस पोरजी, युवा शहराधिकारी अभिषेक ठाकूर, विभाग प्रमुख शनिदास पाटील, संजय जाधव उपविभाग प्रमुख योगेश निकम, संदीप राऊत, अशोक अरम



ोडकर, संजय अरदालकर, राजेश गोपने, धनाजी पवार, राजश्री मुंडे, कल्पिता मुंडे, सुहासिनी गुडेकर सर्व शाखाप्रमुख उपशाखाप्रमुख आदी उपस्थित होते.

## कार्यकर्त्यांना बळ देणे हे माझे कर्तव्य : आमदार विलास तरे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, नालासोपारा :** शिवसेनेच्या प्रत्येक कार्यकर्त्याला बळ देणे आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हे माझे मुख्य कर्तव्य आहे, असे स्पष्ट मत आमदार विलास तरे यांनी व्यक्त केले. ते नालासोपारा येथे आयोजित पक्ष संघटनात्मक बैठकीत बोलत होते. या बैठकीत जिल्हा प्रमुख वसंत चव्हाण यांनीही उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. संगठन हा कोणत्याही पक्षाचा खरा आधार असतो. आगामी काळात संघटना बांधणीवर भर देत शिवसेनेला नव्या जोमाने उभे करण्याचे उद्दिष्ट आमच्यासमोर आहे, असे चव्हाण यांनी सांगितले. यावेळी या बैठकीत विविध विभागातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नेतृत्व मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यकर्त्यांच्या अडचणी, स्थानिक प्रश्न आणि पुढील राजकीय दिशा यावरही मंथन करण्यात आले.

आमदार विलास तरे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शिवसेनेचा खरा ताकदवान आधार म्हणजे तिचे निष्ठावान कार्यकर्ते..! त्यांच्यामुळेच पक्षाची वाटचाल पुढे होत असते.



म्हणूनच त्यांच्या समस्या समजून घेणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणे ही माझी जबाबदारी आहे. कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचा आणि पक्षाच्या मूळ विचारधारेवर आधारित कार्यपद्धतीला चालना देण्याचा निर्धार या बैठकीत घेण्यात आला.

वसई विरार शहर महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेच्या आगामी निवडणुकांमध्ये स्थानिक कार्यकर्त्यांना संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती आमदार विलास तरे यांनी दिली. ते म्हणाले की, आमच्या पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यांपैकीच एखादा व्यक्ती या निवडणुकीत निवडून येईल. आमदार तरे यांच्या या घोषणेमुळे स्थानिक पातळीवर पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांनी पुढे सांगितले की, स्थानिक पातळीवरील नेतृत्वाला प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या योगदानाची दखल घेणे हे पक्षाचे उद्दिष्ट आहे. वसई विरार महानगरपालिका क्षेत्रात विविध विकासकामे आणि जनसंपर्क उपक्रम राबविण्यात येत आहेत. महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळानुसार, शहरातील नागरिकांसाठी विविध सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. आगामी निवडणुकांमध्ये स्थानिक नेतृत्वाला संधी दिल्याने, नागरिकांच्या अपेक्षा आणि गरजांची अधिक चांगली पूर्तता होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

**संघटना बांधणीद्वारे शिवसेनेला नवी उभारी देणार : शिवसेना जिल्हाप्रमुख वसंत चव्हाण**

शिवसेना पालघर जिल्हाप्रमुख वसंत चव्हाण यांनी आज स्पष्ट केले की, संघटनात्मक बळकटी आणि जनसंपर्क वाढवून शिवसेनेला नवसंजीवनी देण्याचा त्यांनी निर्धार केला आहे. त्यांनी पालघर जिल्ह्यातील विविध ठिकाणी जनसंपर्क कार्यालयांची उभारणी सुरू केली असून, यामाध्यमातून लोकांशी थेट संवाद साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. शिवसेनेची विचारधारा ही सामान्य जनतेच्या हिताची आहे. गावपातळीपासून जिल्हास्तरापर्यंत संघटना मजबूत करून आम्ही पुन्हा एकदा जनतेच्या मनात शिवसेनेचा विश्वास प्रस्थापित करणार आहोत, असे वसंत चव्हाण यांनी यावेळी सांगितले. यावेळी उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांनीही वचन दिले की, आगामी काळात पक्ष संघटनेच्या माध्यमातून जनतेच्या अडचणी सोडवण्यासाठी सक्रिय भूमिका बजावली जाईल.

अक्षराज

# भाताणे आश्रमशाळेत अमानवी शिक्षेचा प्रकार

## विद्यार्थ्यांना काढायला लावल्या जबरदस्तीने उठाबशा; एका विद्यार्थिनीची प्रकृती खालावली



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०७, पालघर :** पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील डहाणू आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या भाताणे येथील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेत अमानवी शिक्षेचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बाराखडी नीट लिहू न आल्याच्या कारणावरून शाळेतील शिक्षकाने विद्यार्थ्यांना जबरदस्तीने शंभरहून अधिक उठाबशा काढण्याची शिक्षा दिली. या शिक्षेमुळे एका विद्यार्थिनीची तब्येत बिघडली असून तिच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. डहाणू तालुक्यातील उर्मिला संदीप तल्हा या विद्यार्थिनीला गेल्या सहा दिवसांपासून शारीरिक त्रास जाणवत होता. चालताना त्रास होऊ लागल्याने तब्बल चार दिवसांनी तिला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, शाळा प्रशासनाने तिच्या प्रकृतीबाबत कोणतीही माहिती पालकांना दिली नसल्याचा आरोप तिच्या कुटुंबीयांनी केला आहे. याबाबत आम्ही शाळेच्या मुख्याध्यापकां ना या घडलेल्या प्रकाराबाबत विचारणा केली असता विद्यार्थ्यांना संबंधित शिक्षिकेने अभ्यास करण्यास सांगितल होते. मात्र त्यामधील काही विद्यार्थ्यांनी अभ्यास पूर्ण केला नव्हता मात्र क्षमतेपेक्षा जास्त बैठका काढले असतील म्हणून त्रास झाला असेल संबंधित विद्यार्थिनीला हॉस्पिटलमध्ये दाखल करून उपचार केले असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र असे असले तरी

या प्रकारामुळे पालकांमध्ये संतापाची लाट असून, संबंधित शिक्षकावर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. यासोबतच सामाजिक कार्यकर्त्यांनी देखील या घटनेचा निषेध करत शाळा प्रशासनावर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

संपूर्ण पूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी पालक, ग्रामस्थ आणि सामाजिक संघटनांकडून केली जात आहे. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचे हक्क आणि आरोग्य सुरक्षित ठेवणं ही शासकीय यंत्रणेची जबाबदारी असल्याचं मत अनेकांनी व्यक्त केलं आहे.

> आम्ही वीटभट्टीवर काम करून आमचा उदरनिर्वाह करतो आम्हाला शिक्षण घेणे शक्य झाले नाही त्यामुळे आमच्या मुलीला शिकवण्याचा आमचा प्रयत्न आहे. आम्ही मुलीला शासकीय यंत्रणेच्या भरोश्यावर शाळेत ठेवले मात्र शिक्षिकेकडून आमच्या मुलीला अमानुष शिक्षा देण्यात आली. या शिक्षिकेवर कठोर कारवाई करावी अशी आमची मागणी आहे.
>
> **- संदीप तल्हा, पालक**

> विद्यार्थिनींनी गृहपाठ केला नसल्यामुळे त्यांना शिक्षा देण्यात आल्याची माहिती शाळा प्रशासनाकडून देण्यात येत आहे. याविषयी अधिक माहिती घेण्यासाठी प्रकल्प कार्यालयामार्फत एक समूह पाठवण्यात आला आहे. त्यांच्याकडून योग्य चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल.
>
> **- सत्यम गांधी, प्रकल्प अधिकारी डहाणू**

# थोडक्यात

## आमदार दाते यांच्या माध्यमातून स्मशानभूमी, चौक सुशोभीकरणासाठी २० लाख निधी मंजूर



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०७, सुपा (अहिल्यानगर) :** सुपा आमदार काशीनाथ दाते यांच्या माध्यमातून अपधूप स्मशानभूमीचे सुशोभीकरण करण्यासाठी १० लक्ष व चौक सुशोभीकरणासाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती युवा नेते ब्रिजेश बोरुडे यांनी दिली. अपधूप (ता.पारनेर) येथील स्मशानभूमीचे सुशोभीकरण व चौक सुशोभीकरणासाठी निधी मिळावा. अशी मागणी, उद्योजक सुरेश शेठ गवळी व युवा नेते ब्रिजेश बोरुडे यांनी आमदार काशीनाथ दाते यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. आमदार काशीनाथ दाते यांनी तातडीने दखल घेत स्मशानभूमीचे सुशोभीकरण करण्यासाठी १० लाख रुपयांचा निधी तसेच चौक शिवशोभीकरणासाठी १० लाखांचा निधी मंजूर केला आहे. तसेच गेल्या ४ वर्षात विकासात्मक कामे झाली आहेत. यावेळी माजी सरपंच किसन साहेबराव गवळी, संतोष भगवंत गवळी, पुष्कराज गवळी, संकेत सोनवणे, आदी उपस्थित होते.

## १२ वर्षांच्या मुलाने हरवलेला iPhone 13 केला पोलिसांच्या स्वाधीन



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०६, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली पश्चिम येथील जय हिंद कॉलनीत राहणाऱ्या १२ वर्षीय सोहम नरेश परदेशी या लहान मुलाने आपले प्रामाणिकपणा दाखवत हरवलेला iPhone 13 पोलिसांच्या स्वाधीन केला. गुप्ते रोड परिसरात संध्याकाळी आपल्या मित्रांसोबत खेळत असताना खेळाचा चेंडू झाडावळ गेल्यामुळे तो उचलायला गेलेला असताना त्याला अंदाजे १ लाख किंमतीचा iPhone 13 सापडला. सोहमने तत्काळ आपल्या वडिलांना फोन करून घटनेची सविस्तर माहिती दिली. त्यानंतर त्याचे वडील नरेश परदेशी यांनी सदर फोन विष्णूनगर पोलीस ठाण्यात नेऊन गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गहिनीनाथ गमे यांच्या स्वाधीन केला. या प्रामाणिकपणाबद्दल पोलिस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी वर्गाने सोहमचे कौतुक करत त्याचा गौरव केला. पोलीस निरीक्षक गहिनीनाथ गमे यांनी सांगितले की, सदर iPhone 13 पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्यात आले असून, ज्याचा हा मोबाईल आहे त्याने आपली ओळख व मोबाईलची कागदपत्रे घेऊन पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. सोहमसारख्या लहान मुलांच्या प्रामाणिक वर्तनामुळे समाजात सद्वर्तनाचे उदाहरण निर्माण होत असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

## श्री क्षेत्र शिखर शिंगणापुर मधील मानाच्या कावडीचे जंगी स्वागत



**अक्षराज : शरद भगत**

**दि.०७, मुर्टी (बारामती) :** श्री क्षेत्र शिखर शिंगणापुर येथे मान असलेली सासवड येथील तेल्या भुत्याची कावड चैत्र पायी वारी करत शिखर शिंगणापुर ला जात असते. सासवड हून कोळविहिरे मार्गे बारामती तालुक्यात प्रवेश करते. बारामती तालुक्यातील मुर्टी येथे दुपारी १ वाजता आगमन होते. या कावडीचे जंगी स्वागत झाले. फलटण येथील चाँदतारा डीजे, पारंपारिक वाद्ये यांच्या तालावार मुर्टी गावाला प्रदक्षिणा घालण्यात आली. भाविकांना बसण्यासाठी तानाजी खोमणे व संदीप (सनी) बालगुडे यांच्या वतीने मांडव घातला गेला तसेच बसण्यासाठी खुर्च्या देखिल व्यवस्था करण्यात आली होती. मुर्टी येथील उद्योजक संदेश जगताप व जगताप बंधूच्या वतीने त्यांच्या आईच्या सुनंदा प्रकाश जगताप यांच्या स्मरणानिमित्त भाविकांना मोफत थंड पेय व फळांचे ज्युस वाटप करण्यात आला. सासवडच्या मानाची तेल्या भुत्याची कावडी मुर्टीत आल्यामुळे मुर्टी येथे यात्रेचे स्वरुप आले होते. मुर्टी येथून भक्तिमय वातावरणात कावडीला पुढील गावी जाण्यासाठी निरोप देण्यात आला.

## महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला पाठिंबा देण्याकरिता खापरखेड्यात भव्य विशाल मोर्चा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०७, नागपूर :** बौद्धगया येथे महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला पाठींबा देण्याकरिता सोमवार, दिनांक ०७ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० वाजता भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दल यांच्या संयुक्त विद्यमाने अन्ना मोड ते पोलीस ठाणे खापरखेडा पर्यंत पूज्यनीय भंते नागवंश महाथेरो यांच्या नेतृत्वात भव्य विशाल महामोर्चा काढण्यात आला.

सम्राट अशोकाने इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात महाबोधी महाविहाराचे बांधकाम केले. तथागत बुद्धाला ज्या बोधी वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली तो बोधीवृक्ष याच महाबोधी महाविहार परिसरात आहे. त्यामुळे देशातील नव्हे, तर जगभरातील बौद्ध अनुयायी भिक्खू आणि पर्यटक या स्थळाला भेट देतात. मात्र या महाविहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन आजही बौद्धांच्या ताब्यात नाही. महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, यासाठी देशभर आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला देशभरातून पाठिंबा मिळत असून या आंदोलनाला पाठिंबा देण्याकरिता भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दल आणि खापरखेडा परिसरातील सर्व बुद्ध अनुयायी, उपासक, उपासिकांनी शेकडोच्या संख्येत अण्णा मोड ते पोलीस स्टेशन खापरखेडा पर्यंत भव्य विशाल मोर्चा काढला. त्याचप्रमाणे महाविहाराबाबतचा १९४९ चा कायदा रद्द करून महाविहार बौद्ध भिक्खू संघाच्या ताब्यात द्यावा.

अशी मागणी भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल आणि शेकडोच्या संख्येत उपस्थित बौद्ध अनुयायांच्या वतीने खापरखेडाचे पोलीस निरीक्षक यांच्या मार्फत भारतातील महामहीम राष्ट्रपती यांना निवेदनातून करण्यात आली.

# मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे कार्यकर्त्यांना तयारीचे आवाहन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, राहाता (अहिल्यानगर) :** येथे भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त पार पडलेल्या विशेष कार्यक्रमात जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये 'शत प्रतिशत भाजप' विजयाचे उद्दिष्ट ठेवत कार्यकर्त्यांना तयारीचे आवाहन केले. भाजपने देशात आणि राज्यात विकास व विचारांच्या जोरावर सत्ता स्थापन केली आहे.

आता हीच रणनीती स्थानिक निवडणुकीत उतरवण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने मंत्री विखे पाटील यांनी शिर्डी विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी विधानसभा निवडणुकीत दिलेल्या परिश्रमांचे कौतुक केले. त्यांच्या मते, या मेहनतीमुळे राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार स्थापन होऊ शकले. राज्यातील जनतेने दिलेला जनाधार हा ऐतिहासिक ठरला असून भाजपने सदस्य नोंदणी अभियानात महाराष्ट्रात दिड कोटी सदस्यांचा टप्पा पार केला आहे. यामध्ये शिर्डी मतदारसंघाच्या कार्यकर्त्यांनी मोठे योगदान दिले.

जनतेचा विश्वास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, महायुती सरकारने सुरू केलेल्या योजनांमध्ये एकही योजना थांबवली गेलेली नाही. जनतेच्या विश्वास संपादन करण्यासाठी योजनांची अंमलबजावणी प्रामाणिकपणे केली जात आहे.

विरोधकांकडून येणाऱ्या आरोपांवर भाजप कार्यकर्त्यांनी आत्मविश्वासाने लढा दिला आहे आणि हा आत्मविश्वासच पक्षाच्या यशाचे मुख्य कारण आहे. विखे पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाचा गौरव केला. जम्मू -काश्मिरमधील कलम ३७० रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय आणि वक्फ बोर्डाच्या संदर्भातील सुधारणांचे विधेयक यामुळे देशात नवी दिशा मिळाली असल्याचे ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधत कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. त्यांनी राज्यात पुन्हा मुख्यमंत्री पदावर काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल कार्यकर्त्यांचे आभार मानले.




> जिल्ह्यातील नेतृत्वाचा सन्मान मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात जिल्ह्यातील स्वर्गीय सूर्यभान पाटील वहाडणे आणि नाथासाहेब फरांदे यांचे नाव घेत त्यांच्या योगदानाचा विशेष उल्लेख केला. कार्यक्रमास अनेक पदाधिकारी, जेष्ठ कार्यकर्ते, महिला मोर्चा आणि ओबीसी मोर्चाचे नेते उपस्थित होते. अहिल्यानगरमध्ये भाजप कार्यकर्त्यांची एकजूट आणि तयारी पहाता येणाऱ्या निवडणुकांमध्ये भाजपाचा झेंडा फडकण्याचे संकेत मिळत आहेत.

# निर्यात शुल्क हटवून ही दरात वाढ नाही

## टाकळी ढोकेश्वर भागातील कांदा उत्पादक शेतकरी संकटात

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** मोठ्या कष्टाने पिकविलेल्या शेतकऱ्यांच्या कांद्याला प्रतवारीनुसार ६० ते १६० रुपये दर मिळत आहे. ०१ एप्रिलपासून कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करण्याचा आले. मात्र, तरीही कांद्याला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अवकाळीच्या वातावरणात शेतकरी विविध समस्यांना तोंड देत असताना घसरलेल्या बाजारभावामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.

काढणी केलेल्या कांद्याला समाधानकारक दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या शेतातच पडून असून, काही शेतकऱ्यांकडून अवकाळीच्या धास्तीने साठवणूक करण्याची लगबग सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. यावर्षी कांद्याचे भाव समाधानकारक राहतील, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. प्रतिकूल वातावरणात शेतकऱ्यांनी यशस्वी उत्पादन घेतले. सध्या उन्हाळी कांद्याची काढणी सुरू आहे. या कांद्याला प्रति १० किलोला प्रतवारीनुसार ६० ते १६० रुपये, तर सरासरी १२० रुपये दर मिळत आहे. केंद्र सरकारकडून १ एप्रिलला २० टक्के निर्यात शुल्क रद्द करण्यात आले. मात्र तरीही दरामध्ये वाढ होण्याची अपेक्षा असताना कांद्याचे दर घसरल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. कांद्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले आहे. अवकाळीच्या भीतीने शेतकरी धास्तावला चैत्र महिन्यातील उन्हाची काहिली, ढगाळ वातावरण आणि अवकाळी पावसाच्या वातावरणाने शेतकऱ्यांची अवस्था केविलवाणी झाली आहे. आकाशामध्ये ढगाळ वातावरण तयार होऊन पावसाची शक्यता निर्माण होत असल्याने शेतकऱ्यांची तारांबळ उडत आहे. अवकाळी पाऊस, मजूरटंचाईच्या गर्तेत शेतकरी अडकला आहे. पावसाच्या भितीने शेतातच आरण लावून कांद्याची पात टाकून कांदा झाकून ठेवण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. कांद्याचा उत्पादन खर्च पाहता सध्याचे दर परवडत नाहीत. त्यामुळे साठवणूक व्यवस्था असलेल्या शेतकऱ्यांनी कांदा साठवणूकीवर भर दिल्याचे चित्र टाकळी ढोकेश्वर भागात पाहायला मिळत आहे.



> **सरकारकडून प्रभावी अंमलबजावणी कधी होणार ?**
>
> ०१ एप्रिलपासून कांद्यावरील २९ टक्के निर्यात शुल्क हटवण्याची घोषणा करण्यात आली. मात्र बाजारात कांद्याच्या दरात अपेक्षित वाढ झाल्याचे दिसून येते नसल्याने शेतकरी वर्गातून नाराजी व्यक्त केली जात आहे. सरकारकडून प्रभावी अंमलबजावणी कधी होणार? असा प्रश्न शेतकरी उपस्थित करतत आहेत.

# अतिट एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे उत्साहात लोकार्पण

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०७, खंडाळा (सातारा) :** अतिट तालुका खंडाळा येथे गेल्या १ वर्षांपासून ऐसीजी केअर फॉउंडेशन मुंबई यांच्या सी.एस.आर निधीतून इनोरा नो हाऊस फौंडेशन पुणे आणि अतिट ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने एक पाऊल स्वच्छतेकडे एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यात येत असून गाव स्वच्छ, सुंदर आणि निरोगी राहण्यासाठी तसेच सद्याच्या धक्का-धक्कीच्या जीवनात गावातील नागरिकांना रोजच्या आहारात लागणाऱ्या ताज्या सेंद्रिय पालेभाज्या गावातील प्रत्येक कुटुंबासाठी गावातच उपलब्ध व्हाव्यात. या उद्दात हेतूने राबविण्यात येत असलेल्या या प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा नुकताच अत्यंत उत्साहात पार पडला. या सोहळ्यासाठी एसीजी केअर फाउंडेशन मुंबईचे सीएसर मॅनेजर चंद्रशेखर वाळके, खंडाळा पंचायत समिती गटविकास अधिकारी अनिल वाघमारे, स्वच्छ भारत मिशनचे अतुल गायकवाड, इनोरा नो हाऊ फॉउंडेशनच्या ट्रस्टी मेंबर नुतन भाजेकर,सीएसआर प्रोग्राम मॅनेजर श्रद्धा भागवत, प्रोजेक्ट मॅनेजर मुळीक, जायगुडे, अतिट गावच्या आदर्श सरपंच रुपाली अंकुश जाधव, उपसरपंच सुनिता चव्हाण, सदस्या सुषमा चव्हाण, अतिट वि.सेवा.सोसायटी चेअरमन मधुरा शंकर जाधव, संचालक विठ्ठल कोंडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष चंद्रकांत जाधव, माजी सरपंच बाळासाहेब जाधव, चंद्रकांत जाधव आदी मान्यवरांसह अतिट ग्रामस्थ आणि जि.प.शाळा शिक्षक वृंद, विद्यार्थी उपस्थित होते. अतिट गावचे ग्रामदैवत श्री म्हंकाईमाता मंदिरात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित ग्रामस्थांना चंद्रशेखर वाळके यांनी मार्गदर्शन केले. तसेच ग्रामस्थांचे विशेष कौतुक केले. गटविकास अधिकारी अनिल वाघमारे यांनी या उपक्रमाबाबत मार्गदर्शन करताना ग्रामपंचायत, सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य यांचे विशेष कौतुक केले.